## पिंपळी

*Piper longum* **Family: Piperaceae**

**विविध भाषांमधील नावे:**

पिप्पल, पिप्पल मुल, हिप्पाली, तिप्पली, मागधी, लोंग पेपर





### Morphology:

It is a climber that grows wide in India, Nepal. Stem is flexuous, pubescent and terete. Leaves are simple, petiolate, blade ovate, papery, apex acuminate. Inflorescence is cylindrical, slightly curved spike. Fruit is drupaceous, globose.

**वनस्पतीची वर्णन:**

रोमन लोक पिंपळीचे चाहते होते. मध्ययुगात तिला बरेच महत्त्व होते. हिच्या बारीक खोडांवर आणि फांद्यांवर साधी एका आड एक, गुळ-गुळीत, अखंड पाने असतात. हा पायपरेसी कुळातील एक सपुष्प वेल आहे. पिपंळी ची लागवड तिच्या फळासाठी केली जाते. ती मूळची श्रीलंका व फिलीपाइन्स बेटे येथील असून भारत, नेपाल, श्रीलंका इत्यादी देशामध्ये आढळते. भारतात तामिळनाडू, आसाम, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र व मेघालय या राज्यात तिची लागवड केली जाते. पिपंळी ही बहुवर्षायू वेलं मुळाच्या आधाराने वर चढते. पाने साधी व एका आड एक असतात. जुनी पाने हिरवी, दंतुर आणि हृद्याकृती असतात. कोवळी पाने अंडाकार व लांब असून त्यावर पाच शिरा असतात. फुले कणीश फुलोऱ्यात येतात. नर-फुलांचे देठ मादी फुलांहून लांब असतात. फळे गुच्छात, हिरवी, चमकदार व मांसल फुलोऱ्यात असतात. ती पिकल्यावर लाल होतात आणि सुकल्यावर धुरकट काळी होतात. फळे सुगंधी व तिखट-गोड असतात. त्यामुळे फळांना एक विशिष्ट सुगंध येतो.

**बहर येण्याचा कालावधी:**

**औषधी उपयोग:**

पिपंळीचे मूळ, फळ व खोड उपयुक्त आहेत. कफ, दमा, वात, खोकला, ताप, मुळव्याध, कावीळ आणि कुष्ठरोग या विकारांवर हे भाग उपयुक्त आहेत. लहान मुलांना कफ, वात व खोकला होऊ नये म्हणून त्यांना दिल्या जाणार्या गुटीत पिपंळीच्या फळांचा समावेश करतात. फळे सामान्यपणे सुकवितात. आणि ती मसाल्यात तसेच पदार्थ टिकवण्यासाठी वापरतात.

**लागवड पद्धत:**